# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा) महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका एक—विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

रविवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०१८

(**वेळ** : सकाळी १०-३० ते दुपारी १-१५)

(**एकूण गुण** : १००)

---

**सूचना.**—(१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

गुण

**प्रश्न क्र.१** खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५ ते ६ ओळींत लिहा :- २५

(अ) महात्मा गांधी यांची श्रमप्रतिष्ठेची शिकवण प्रत्यक्षात आणण्यासाठी धर्माधिकारी यांनी शालेय वयात कोणकोणती कामे केली ?

(ब) विद्या बाळ यांच्या मते आनंदोत्सव साजरा करताना आपण कोणत्या मर्यादा पाळणे आवश्यक आहे ?

(क) बाबा आमटे यांच्या संवेदनशील वृत्तीचा प्रत्यय कोणकोणत्या प्रसंगातून दिसून येतो ?

(ड) लेखक बी. जी. वाघ यांच्या मते निसर्ग माणसाला कोणती शिकवणूक देत असतो ?

(इ) केशवच्या घरी आल्याबद्दलचा पश्चाताप लेखकाला का झाला ?

(फ) ग.दि.माडगूळकरांना परमेश्वराचे अस्तित्व कोठे कोठे जाणवते ?

(ग) कवी रोहिदास पोटे प्रलय कशाला म्हणतात ? का ?

(ह) भारतामधील विविधतेतील एकता आश्लेषा महाजन आपल्या कवितेतून कशी विशद करतात ?

**प्रश्न क्र. २** खालीलपैको कोणत्याही **दहा** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :- २०

(अ) मित्रांशी बोलताना आपण कोणते विषय टाळतो ?

(ब) धर्माधिकारी व त्यांच्या सोबत्यांनी कोणता क्लब स्थापन केला ?

(क) राजा रविवर्मा यांचे टोपणनाव काय होते ?

(ड) कृष्णाबाई सुर्वे मास्तरांबरोबर कोणता पुरस्कार घ्यायला नाशिकला गेल्या ?

(इ) कोणती नदी रारंगढांगला वळसा घालून वाहते ?

(फ) पन्हाळ्याचा दरगाह कोणत्या बादशाहने बांधला ?

(ग) कुष्ठरोगाचा अभ्यास करण्यासाठी बाबा आमटे कोठे गेले ?

(ह) पुस्तकरावांनी कोणत्या रंगाचे कपडे घातले होते ?

(य) संत सोयराबाईंच्या मते, संसाराचे सुख कशासारखे आहे ?

(र) कवीच्या घरट्यामध्ये मंद्र सप्तकात कोण गाते ?

(ल) कवितेतील आमराई कोठे आहे ?

(व) काय बनून स्त्रीने स्वत:चे हक्क घ्यावेत ?

(श) कवयित्री आश्लेषा महाजन यांना जीवन कसे वाटते ?

**प्रश्न क्र.३** रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरून वाक्य पुन्हा लिहा :-

(अ) गैरसमज तर असे आणि इतक्या ------------- कारणांमुळे होतात की ते कसे टाळावेत हे समजतच नाही. (महत्त्वाच्या / क्षुल्लक / मोठ्या)

(ब) वर्धा येथील बजाजवाडी हे चालते-बोलते ------------- होते. (पर्यटनक्षेत्र / तीर्थक्षेत्र / पवित्रक्षेत्र)

(क) स्वर्गाची गंगा आज तुझ्या ------------- अवतरली आहे. ( दारी / घरी / समोर)

(ड) ------------- अकादमीच्या समितीवरही मास्तरांची वर्णी लागली. (राष्ट्रीय / कला / साहित्य)

(इ) इथं येण्यापूर्वी कधीही न ऐकलेला, हा आवाज ------------- ! ( शांततेचा / पाण्याचा / वाऱ्याचा)

(फ) बहिणाबाईंच्या शब्दात ------------- हरवते असं वाटतं. ( स्वत्व / ओळख / निजखूण)

(ग) हा कोण लागून गेला ------------- , आपल्या घरात येऊन झोपणारा ? (शहाणा / टिक्कोजीराव / बाजीराव )

(ह) शादुद्दोन वलींना ------------- असंही म्हणतात. (दादोबा / सादोबा / आजोबा)

(य) अवघा निरसला ------------- । देखता संतचरण ॥ (भाव / शीण / मान )

(र) असे ------------- श्रमांचा पुजारी ! (मुरारी / श्रीहरी / विश्वकर्मा)

(ल) मातीलाही सुगंध यावा ------------- भाकरीचा. (कष्टाच्या / घामाच्या / मेहनतीच्या)

(व) गावापासून केले दूर ------------- पोटाने. ( टीचभरच्या / वीतभरच्या / बोटभरच्या)

**प्रश्न क्र.४** (अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा :- १०

(१) आर्जव करणे (२) निगा राखणे

(३) भान हरपणे (४) विवंचना असणे

(५) दखल घेणे (६) हैराण करणे

(७) चढाओढ असणे (८) कबुली देणे

(ब) खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचे अर्थ लिहा :- ०५

(१) विद्वान (२) माधुर्य

(३) संताप (४) पुरस्कार

(५) सुधारणा (६) निमित्त

(७) अडसर (८) महाल

**प्रश्न क्र.५** (अ) 'अ' गटातील विशेषणे व 'ब' गटातील नामे यांच्या योग्य जोड्या जुळवा. ०६

| 'अ' | **'ब'** |
|---|---|
| (१) मोकळा | रस्ता |
| (२) जिवलग | हवा |
| (३) उगवता | संवाद |
| (४) डांबरी | कपडे |
| (५) गार | मैत्रीण |
| (६) उंची | सूर्य |

(ब) खालीलपैकी कोणत्याही **पाच** अधोरेखित शब्दांचे लिंग ओळखा (कोणतेही सहा):- ०६

(१) दोन विद्वान माणसांची एक <u>गोष्ट</u> सांगतात.
(२) महात्मा गांधीजींनी <u>चरखा</u> हे श्रमाचे प्रतीक मानले होते.
(३) त्या वेळी रविवर्म्याचं <u>मन</u> भरून आलं होतं.
(४) मला या ऋतुबदलाचा <u>आनंद</u> साजरा करावासा वाटतो.
(५) मुंग्यांनी मातीचे कण कण आणून तयार केलं एक मोठं <u>वारूळ.</u>
(६) आता दरगाहजवळ मुजावराची मोठी <u>वस्ती</u> आहे.
(७) बाबांचा <u>दवाखाना</u> आनंदवनी झाडाखाली सुरू झाला.
(८) केवढं विराट <u>संगीत</u> आहे या पर्णराजीत.

(क) खालीलपैकी कोणत्याही **सहा** नामांची वचने बदला :- ०६

(१) दगड (२) जोडपे
(३) तत्त्व (४) साखळी
(५) आठवण (६) पायरी
(७) रस्ते (८) पाटी

(ड) खालीलपैकी कोणत्याही **सहा** शब्दांचे मूळ रूप लिहा :- ०६

(१) स्थानिक (२) सुगंधी
(३) सात्विक (४) जिज्ञासू
(५) रागीट (६) सामाजिक
(७) मायाळू (८) प्रादेशिक

(इ) कंसात दिलेल्या सूचनांप्रमाणे बदल करून कोणतीही सहा वाक्ये पुन्हा लिहा. ०६

(१) माझाही वेळ फार छान गेला. (भविष्यकाळ करा)
(२) त्याची भाषा केवढी वेगळी आहे. (उद्गारार्थी करा)
(३) मुलगा शाळेत जातो. (कर्त्याचे वचन बदला)
(४) मुले कबड्डी खेळून थकून गेली. (कर्त्याचे लिंग बदला )
(५) ते दोघे <u>एकाच वयाचे</u> आहेत. (अधोरेखित शब्दासाठी एक शब्द वापरा)
(६) जेवण अगदी साधे होते <u>आणि</u> त्या मानाने बिल भरमसाठ होते. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)
(७) ती मुलगी मेहनती आहे. (नकारार्थी वाक्य करा)
(८) त्याने केलेल्या भोजणाचा अस्वाद घ्यावा. (वाक्य शुद्ध करून लिहा)

-*-*-*-*-*-

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा) महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा
## प्रश्नपत्रिका दोन—सुसंगत लेखन व अनुवाद

रविवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०१८

(**वेळ** : दुपारी २-१५ ते सायंकाळी ४-४५)

(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)

(**एकूण गुण** : १००)

---

**सूचना.**—(१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

**गुण**

**प्रश्न क्र. १** खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा :- २०

(अ) वाढती लोकसंख्या - एक गंभीर प्रश्न..
(ब) खड्डेमुक्त रस्ते - एक दिवास्वप्न..
(क) पृथ्वीवरचा हरितपट्टा नाहिसा होत आहे..

**प्रश्न क्र.२** खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर चर्चा करा :- २०

(अ) कायद्याच्या आधारे समानता येईल ?
(ब) शिक्षणाचे माध्यम मातृभाषाच असावे का ?

**प्रश्न क्र.३** खालीलपैकी कोणत्याही **दोन** बाबी तयार करा :- ३०

(अ) अर्जित रजेचा अर्ज, त्यावरची टिप्पणी व त्यावरील कार्यालयीन आदेश बनवा.
(ब) पावसाळ्याआधी आपल्या परिसरातील सर्व गटारे व नाल्यांची सफाई करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यास विनंतीपत्र लिहा.
(क) सतत कुठल्यातरी निमित्ताने गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्याला समज देणारे सूचनापत्र काढा.
(ड) कार्यालयीन कामात मराठीचा प्रभावी वापर करण्यासाठी कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासंदर्भात आदेश तयार करा.

**प्रश्न क्र.४** खालीलपैकी कोणत्याही **पाच** इंग्रजी शब्द प्रयोगांसाठी मराठी पर्याय द्या :- ०५

(अ) Adverse remark
(ब) Consolidated leave
(क) Essential services
(ड) Grant-in-aid
(इ) Keep pending
(फ) Passing of bill
(ग) Refund of advance
(ह) Sample survey

**प्रश्न क्र.५** खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्यांचे मराठीत भाषांतर करा :- १०

(अ) She make a solemn promise not to do it again.

(ब) The pigeon made its nest on the ledge of building.

(क) It is necessary to wear a seat-belt when travelling in a car.

(ड) I wrote the address on the envelope.

(इ) We will have to hurry otherwise we will be late.

(फ) July is the month I was born in.

(ग) Smoking is banned in this restaurant.

**प्रश्न क्र. ६** खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :- १५

If parents and teachers show the required dedication to shape the lives of the young, India would get a new life. As it is said : Behind the parents stands the school and behind the teacher the home. Education and the teacher-student relationship have to be seen not in business terms but with the nation's growth in mind. A proper education would help nurture a sense of dignity and self-respect among our youth. These are qualities no law can enforce - they have to be nurtured ourselves.

-*-*-*-*-*-*-